Scan QR code to visit ... Epaper Portal

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www.sahyandrinews.com

Scan QR code to visit ... Epaper Portal

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १३२ • Title - Code :- MAHMAR49513 • शनिवार दि.१० फेब्रुवारी २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# ८०० वर्षापूर्वीच्या मंदिराचे पुनरुज्जीवन केल्याचा आनंद-सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार

## देवाडा येथे श्री.सिद्धेश्वर शिवालय देवस्थानच्या कामाचे भूमिपूजन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राजुरा तालुक्यातील देवाडा येथील श्री. सिध्देश्वर मंदीरांचा समूह हा १२ व्या ते १३ व्या शतकातील आहे. पुरातन असलेल्या या मंदिराचे पुनरुज्जीवन आपल्या हातून व्हावे, ही भगवान महादेवाची इच्छा असेल. म्हणूनच सांस्कृतिक कार्य विभागाची जबाबदारी माझ्याकडे आली. या विभागाच्या अधिपत्याखाली असलेल्या पुरातत्व विभागाच्या माध्यमातून ८०० वर्षापूर्वीच्या मंदिराचे पुनरुज्जीवन केल्याचा आपल्याला अतिशय आनंद आहे. विशेष म्हणजे या इश्वरीय कार्याचे आपण सर्वजण साक्षिदार आहोत, अशा भावना राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केल्या.

राजुरा तालुक्यातील देवाडा येथील श्री. सिध्देश्वर शिवालय देवस्थानच्या मंदीर जतन-दुरुस्ती कामाचे भूमिपूजन करतांना ते बोलत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, पुरातत्व विभागाचे संचालक तेजस गर्गे, सहायक संचालक मयूरेश खडसे, तहसीलदार ओमप्रकाश गौड, गटविकास अधिकारी हेमंत भिंगारदेव, वढा येथील श्री. संत स्वामी चैतन्य महाराज, देवराव भोंगळे, ङ संजय धोटे, सुदर्शन निमकर, सिध्देश्वर शिवालय देवस्थानचे अध्यक्ष राधेश्याम कुर्मावार, देवाडाचे सरपंच शंकर मडावी, सोंडोचे सरपंच जयपाल आत्राम , दिलीप वांढरे , सतीश कोमरपल्लीवार, श्रीनिवास मंथनवार, विनोद नेरदुलवार आदी उपस्थित होते.पहिल्या टप्प्यात १४






कोटी ९८ लक्ष रुपये खर्च करून मुख्य मंदीर आणि तीन ज्योतिर्लिंगच्या कामाचे भूमिपूजन झाले, अशी घोषणा करून सांस्कृतिक कार्य मंत्री श्री. मुनगंटीवार म्हणाले, ८०० वर्षापूर्वीच्या या मंदिराला एक इतिहास आहे. हे इश्वरीय काम माझ्या हातून घडावे, अशी भगवान महादेवाचीच इच्छा असेल. म्हणूनच पुरातत्व विभाग येत असलेल्या सांस्कृतिक कार्य विभागाचा मंत्री म्हणून सेवा करण्याची संधी मला प्राप्त झाली. मनात भाव ठेवून मंदिराचे पुनर्निर्माण करायचे असून ८०० वर्षांपूर्वी मंदीर जसे होते, तसेच करण्याचा प्रयत्न आहे.पुढे श्री. मुनगंटीवार म्हणाले, इश्वराने ब्रम्हांड निर्माण केले. ब्रम्हांडात पृथ्वी आहे. पृथ्वीवर अनेक देश असून त्यात भारत हा एक देश आहे आणि भारतामध्ये अध्यात्म आहे, याचा आपल्याला सर्वांना अभिमान आहे. पहिल्या टप्प्यात आज मुख्य मंदीर आणि तीन ज्योतिर्लिंगच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले असले तरी दुस-या टप्प्यात महाशिवरात्रीपूर्वीच इतर कामे करण्यासाठी अतिरिक्त १५ कोटींची त्वरीत मान्यता देण्यात येईल. मंदिरापर्यंत जाण्यासाठी १ कोटी २५ लक्ष रुपये रस्त्याकरीता मंजूर करण्यात येईल. तसेच रस्त्यावर सोलर लाईट व प्रवेशद्वारासाठी तीर्थक्षेत्र विकास निधीतून १ कोटी रुपये देण्यात येणार आहे. या परिसरात १००१ बेलाची वृक्षे तर ५०१ रुद्राक्षाची वृक्षे वनविभागाने त्वरीत लावावीत, अशा सुचनाही पालकमंत्री श्री. मुनगंटीवार यांनी दिल्या.

**बांधकामावर नागरिकांनी लक्ष ठेवावे:** जगाच्या कानाकोप-यात भारताचे अध्यात्म पोहचले आहे. जगात सुख शोधण्यासाठी वणवण भटकावे लागते. आपल्या देशात मात्र मंदिरात गेल्यावर सुख आणि समाधान प्राप्त होते. त्यामुळे येथील मंदिराचे बांधकाम अतिशय दर्जेदार आणि गुणवत्तापूर्वक होण्यासाठी स्थानिक नागरिकांनी या कामावर लक्ष ठेवावे, असे आवाहन पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

**पुर्ननिर्माण अंतर्गत होणारी कामे :** देवाडा येथील मंदीर समुह हा १२ व्या ते १३ व्या शतकातील असून येथे लहान-मोठे मंदिर आहेत. येथील मंदिराची रचना गर्भगृह, अंतराळ, मंडम अशी आहे. संपूर्ण मंदिर परिसरास प्रकार भिंतीचे अवशेष व त्यास दुमजली प्रवेशद्वार आहे. या मंदिर परिसराच्या पुननिर्माणाकरीता पहिल्या टप्प्यात १४ कोटी ९८ लक्ष ५६ हजार ९७१ रुपये मंजूर करण्यात आले आहे. यात प्राथमिक टप्प्यात जतन दुरस्ती करणे, या जतन दुरुस्तीच्या कामामध्ये जुन्या बांधकामाचे ग्राऊटींग करणे, पाया खोदकाम करणे, युसीआर बांधकाम करणे, घडीव दगडी पिल्लर, बीम, पेडेस्टल बसविणे, दगडी स्लॅब इंटरलॉकिंग पध्दतीने बसविणे, गर्भगृहातील शिखराचे बांधकाम करणे, बाहय क्षेत्रात दगडी स्लॅबचे वॉटरप्रुफ करणे आदी कामे प्रस्तावित आहे.

# स्टॉक मार्केट म्युच्युअल फंड विषयी व्याख्यान संपन्न

**वरोरा । प्रतिनिधी**

८ फेब्रुवारी रोज गुरुवारला आनंद निकेतन महाविद्यालयात वाणिज्य विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांना स्टॉक मार्केट आणि म्युच्युअल फंड या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे अमित चीलबुले होते.

विद्यार्थ्यांना करिअर बनविण्यासाठी डायरेक्शन क्लियर असणं किती गरजेच आहे तसेच शेअर मार्केट हा करिअर बनवण्याचा उत्तम मार्ग कसा आहे हे त्यांनी विद्यार्थ्यांना पटवून दिले.

यशस्वी जीवन जगण्यासाठी बदल कसा गरजेचा आहे तसेच अवघड हे आहे की कोणत्याही बदलाची सुरुवात शून्यापासून करावी लागते. असे त्यांनी आपले विचार व्यक्त केले.यशस्वी होण्यासाठी यशस्वी व्यक्तीचा सहवास असणे फार आवश्यक




आहे हे त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना पटवून दिले. म्युच्युअल फंडामध्ये इन्व्हेस्टमेंट कशी करावी याची रीतसर माहिती त्यांनी विद्यार्थ्यांना फार हसत खेळत दिली. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी सुद्धा सगळी माहिती हसत खेळ समजून घेतली.याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मृणाल काळे यांनी इन्व्हेस्टमेंट करिता बेसिक ज्ञान असणे गरजेचे आहे हे विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. कल्पना काळे यांनी केले तर संचालन प्रा. विशाखा डोंगरे यांनी केले .तसेच कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. टिपले यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता वाणिज्य विभागातील सर्व सहकारी प्राध्यापक डॉ. चौधरी ,डॉ.पल्लवी वैद्य ,प्रा. संदीप ताजने, प्रा.आशिष येटे ,प्रा. मंगेश मेश्राम, प्रा. राहुल टोंगे, प्रा. फराना शेख. आणि प्रा. चेतना पवार यांनी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

# राहुल गांधीनी केलेल्या ओबीसी समाजाच्या अपमानाबद्दल निषेध आंदोलन

**वरोरा । प्रतिनिधी**

राहुल गांधी यांनी ओबीसी समाजाबद्दल बेताल वक्तव्य केल्याच्या निषेधार्थ डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक वरोरा येथे भव्य निषेध मोर्चाचे आयोजन भारतीय जनता पार्टी वरोरा भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चा व तेली बांधव वरोराच्या वतीने करण्यात आले. राहुल गांधी यांनी ओबीसी समाजाची भावना दुखवून अपमान केला आहे. यावेळी डॉ. आगलावे यांनी सांगितले की ओबीसी समाजाला आर्थिकदृष्टया समाजिकदृष्टया मागास करण्यामागे कॉंग्रेसची सरकार जवाबदार आहे. ओबीसीत अनेक जातींचा समावेश आहे. कॉंग्रसचे खासदार राहुल गांधी यांच्या वक्तव्याने समस्त ओबीसी बांधवाच्या भावना दुखावल्या आहे. या आंदोलनाव्दारे समस्त ओबीसी बांधव राहुल गांधीच्या वक्तव्याचे जाहीर निषेध करीत आहे. यावेळी भारतीय जनता पार्टी, वरोरा चे ज्येष्ठ नेते रमेश राजुरकर, बाबा भागडे, नरेंद्र जीवतोडे, अहतेशाली अली, करण देवतळे, विनोद




गोहाने, आशिष ठाकरे, राजेश साकारे, मधुसूदन टिपले, नंदु हरणे, अमित चवले, दिलिप घोरपडे, अक्षय भिवदरे, प्रकाश दुर्गपुरोहित,बशिर पठान, दादु खंगार, संजु राम, संदीप गांधी, प्रमोद ढवस, जगण ठाकरे, प्रमोद जरिले, जगदीश तोटावार, पंढरी वरभे, गजानन राऊत, ओम यादव, राहुल दागमवार, सुरज धात्रक, त्रिशुल घाटे, राम गानोकर, राजु दोडके, मुंजे , संगिता निंबाळकर, किर्ती कातोर, परसराम मरस्कोल्हे, खुशाल बावने, शरद कातोरे, प्रेम केशवानी, किसन तुपकर, गजानन कारेकार, अभिजीत गसनवार, सुनिल बांगडे, अभय मडावी व भाजपा पदाधिकारी मोठया संख्येने उपस्थित होते.

# अपंगाच्या विशेष कोट्यासाठी अपंगाची प्रशासनाकडे धाव

## राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष रोहित कामडे यांचा पुढाकार

**मूल । प्रतिनिधी**

मुल शहरात नव्याने बांधन्यात आलेल्या ६१ दुकान गाळ्यामध्ये अपंग बांधवाना व्यवसाय करण्यासाठी संधी उपलब्ध होण्यासाठी अपंगासाठी दुकान गाळे राखीव करण्याची मागणी राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे तालुका अध्यक्ष रोहित कामडे यांच्या नेतृत्वाखाली अपंग बांधवानी उपविभागीय अधिकारी विशाल मेश्राम यांच्याकडे केली.

मुल नगरपालिका हद्दीत जिल्हाचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या विशेष प्रयत्नामुळे सुंदर असे ६१ दुकान गाळे असलेले छत्रपती शिवाजी महाराज व्यापारी संकुल उभे राहिले.त्या शॉपिंग कॉम्प्लेक्सच्या दुकान गाळ्याच्या लिलाव प्रक्रियेला सुरवात नगरपालिकेने केली आहे.अनुसूचित जाती,जमाती,भटक्या जमाती, आणी बेरोजगार सेवा सहकारी संस्था व लोकसेवा केंद्राकारिता दुकान गाळे आरक्षित करण्याकरिता नगरपालिकेने जाहिरात काढत १४ तारखेला सोडत ठेवली पण त्यात अपंग बांधवासाठी एकही राखीव दुकान नसल्यामुळे अपंग बांधवानी नाराजी व्यक्त करीत जाहिरातीमध्ये अपंगासाठी राखीव कोठा ठेऊन अपंग बांधवाना व्यवसाय करण्याची संधी द्यावी अशी मागणी मुल चे उपविभागीय अधिकारी तथा नगरपरिषद मुलचे प्रशासक विशाल मेश्राम यांच्याकडे राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे तालुका अध्यक्ष रोहित कामडे यांच्या नेतृत्वाखाली केली.समाजामध्ये अपंग बांधवाना मानाचे स्थान मिळावे.त्यांचा जीवनमान सुधारावा



यासाठी अलीकडील काळात शासन वेगवेगळ्या योजना आणुन अपंगासाठी विशेष प्रयत्न करताना दिसत आहे.अगदी काही दिवसापूर्वी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सुद्धा अपंगाना बसस्थानकावरील दुकान गाळे राखीव ठेवण्याची घोषणा केली. शासन प्रत्येक बाबीमध्ये अपंगाना राखीव कोठा ठेऊन त्याच्या सोबत न्याय करताना दिसत असताना मुल नगरपालिकेने छत्रपती शिवाजी महाराज व्यापारी संकुलातील दुकान गाळ्याच्या जाहिरातीत एकही दुकान गाळे अपंग बांधवासाठी राखीव नं ठेवल्यामुळे अपंग बांधवानी तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली.त्यामुळे हा अपंग बांधवावरील अन्याय दूर कारण्याकरिता राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे तालुका अध्यक्ष रोहित कामडे यांनी अपंग बांधवाना सोबत घेत प्रशासक विशाल मेश्राम यांची भेट घेऊन जाहिरातीत सुधारणा करीत अपंग बांधवाना काही दुकान गाळे राखीव करावे ही विनंती केली.यावेळी राष्ट्रवादी शहराध्यक्ष आकाश येसणकर,योगेश शेंडे,अमन रायपुरे,वसंत कडस्कर,स्वप्नील ऐनप्रेडीवार,अंकुश वाढई आदी उपस्थित होते.

## आर्थिक फसवणूक प्रकरणी संजो कॉन्व्हेंटच्या शिक्षकास अटक

# विद्यार्थ्यांसह पालकांची लाखो रुपयांने केली फसवणूक

## न्यायालयाने सुनावली एक दिवसाची कोठडी

**गोंडपीपरी । प्रतिनिधी**

शहरातील संजो कॉन्व्हेंट मध्ये कार्यरत असलेल्या एका शिक्षकाने मावशीची तब्येत बरी नसल्याचे कारण पुढे करत उपचारासाठी पैशाची गरज असल्याचे सांगून त्याच शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यासह पालकांकडून पैसे मागून फसवणूक केल्याची घटना उघडकीस आल्याने खळबळ उडाली आहे.

एका विद्यार्थीनीने तब्बल सहा तोळे सोने शिक्षकाला दिले.काही दिवसांनी दिलेले सोने परत मागितले असता शिक्षकाने सोने देण्यास टाळाटाळ केल्याने आपली फसवणूक झाल्याचे लक्ष्यात येताच विद्यार्थीनीने पालकाच्या सोबतीने गोंडपीपरी पोलीस स्टेशन गाठून फ,सवणूक व विश्वासघात केल्या प्रकरणी दि.(७)बुधवारी तक्रार दाखल केली.तक्रार नोंदवताच पोलिसांनी तपासाची सूत्रे फिरवत आरोपीला चंद्रपुरात अटक केली.आरोपीचे नाव अखिल रोहणकर असून मूळ तो गोंडपिपरी तालुक्यातील अडेगाव येथील रहिवासी असून अनेक गडचिरोली जिल्ह्यातील वडसा येथे स्थायिक झाला.मागील आठ महिन्यांपासून तो गोंडपिपरी येथील कॉन्व्हेन्ट मधे कार्यरत होता.

गोंडपीपरी येथील संजो कॉन्व्हेंट ही सिबीएससी पॅटर्न ची शाळा आहे. उत्तम व दर्जेदार शिक्षण मिळत असल्याने मुलांच्या उज्वल भविष्यासाठी शहरातील मोठे अधिकारी , विविध विभागातील कर्मचारी , लहान-मोठे व्यावसायिक यासह सधन शेतकऱ्यांची मुले या कॉन्व्हेट मधून शिक्षण घेत आहेत .अखिल रोहणकर यांची संगीत शिक्षक म्हणून संजो कॉन्व्हेंट मध्ये नियुक्ती करण्यात आली. अल्पावधीतच सदर शिक्षकाने



विद्यार्थ्यांची मने जिंकली. संगीत शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांसह पालकात सुद्धा चांगली ओळख झाली. नामांकित शाळेत शिक्षक असल्याचा फायदा घेत रोहनकर यांनी मावशीची तब्येत बिघडल्याने उपचारासाठी मोठा खर्च येणार असल्याने पैशाची नितांत गरज असल्याचे एका विद्यार्थीनिला सांगीतले . घरच्यांना काहीही न सांगता तब्बल सहा तोळे सोने विद्यार्थीनीने शिक्षकाकडे आणून दिले. दरम्यान लवकरच सोने परत करणार असल्याचा विश्वास शिक्षकाने दाखविला. काही दिवसांनी विद्यार्थीनीने शिक्षकाला दिलेले सोने परत मागितले असता सोने देण्यास शिक्षकाने टाळाटाळ केली. आपली फसवणूक झाल्याचे समजून येताच दहावीचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनीने सदर बाब आई वडिलांना सांगितली. लागलीच गोंडपीपरी पोलीस स्टेशन गाठून शिक्षका विरोधात फसवणूक व विश्वासघात केल्या प्रकरणी तक्रार दाखल केली. तात्काळ गोंडपीपरी पोलिसांनी दि.८ गुरुवारी आरोपीस चंद्रपुरातून ताब्यात घेत अटक केली. सदर बाब गोंडपीपरी शहरात पसरताच अनेकांच्या पायाखालची जमीन सरकली व अनेकांनी पोलिसात धाव घेतली. कारण काही दिवसापूर्वी असेच कारण पुढे करीत सदर शिक्षकाने अनेक पालकांच्या घरी जाऊन पैसे मागितले.अडचणीत एकमेकांना मदत केली पाहिजे असे म्हणत अनेक पालकांनी आपल्या क्षमतेनुसार पाच हजार, दहा हजार, विस हजार तर काहींनी ५० हजार पर्यंतची रक्कम त्या शिक्षकाला दिल्याचे चर्चतून समोर आले आहे. फसवणूक व विश्वासघात केल्या प्रकरणी गोंडपीपरी पोलिसांनी त्या शिक्षकाला अटक केली. न्यायालयात आरोपीला हजर करण्यात आले. सदर प्रकरणी पोलिसांकडून ओरोपीची कसून चौकशी व्हावी करीता न्यायालयाने एक दिवसासाठी पोलीस कोठडी सुनावली आहे. पुढील तपास गोंडपीपरी पोलिस स्टेशनचे ठाणेदार रमेश हत्तीगोटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक मनोहर मोगरे करीत आहे.

**“ शहरातील नामवंत कॉनव्हेटचा शिक्षक असल्याने अनेकांनी आपले पाल्य त्या कॉन्व्हेंट मध्ये शिकत असल्याने त्यांना आर्थिक मदत केली .सध्या स्थितीत एकच तक्रार पोलीस स्टेशन येथे दाखल झाली असून फसवणुकीचा प्रकार उघडकीस आल्यानंतर अनेकांनी पोलीस स्टेशन मधे धाव घेतली .यात त्या शिक्षकाने राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या पालकांना देखील फसवल्याची चर्चा आहे.फसवणूक झालेल्यांचे बयान नोंदवणे सुरू असून पुढील तपास गोंडपिपरी पोलीस करत आहे.**

सह्याद्रीचा राखणदार



# साहित्यातील बहुरुपिणी: दुर्गा भागवत!

**दुर्गा भागवत या लोकसंस्कृती आणि लोककलेचे संशोधक म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांनी सुरेख लेखनही केले आहे. त्यांना बौद्ध अभ्यासक, समाजशास्त्रज्ञ आणि मानववंशशास्त्रज्ञ म्हणूनही ओळखले जाते. जयंतीनिमित्त त्यांच्या कार्यकौशल्यांची ज्ञानवर्धक माहिती श्री.एन. कृष्णकुमारजींच्या या शब्दशैलीतून... संपादक.**

दुर्गा नारायण भागवत या भारतीय विद्वान व समाजवादी लेखिका होत्या. त्यांनी संस्कृत आणि बौद्ध साहित्याचा अभ्यास करून आदिवासी जीवनाचा अभ्यास करण्यासाठी मध्य प्रदेशातील जंगलात वेळ घालवला. नंतर त्या संशोधक म्हणून मुंबईत परतल्या आणि मराठीत पुस्तके लिहिली. मराठीतील त्या अग्रगण्य महिला दलित लेखिका आहेत. आणीबाणीला विरोध करणाऱ्या प्रमुख लेखकांपैकी त्या एक होत्या. आज त्या नवलेखिकांच्या प्रेरणास्रोत ठरत आहेत. पद्मश्री आणि ज्ञानपीठ यांसारखे संस्थात्मक आणि नागरी सन्मान स्वीकारण्यापासूनही त्यांनी स्वतःला दूर ठेवले. दुर्गा भागवतजी यांची काही प्रसिद्ध पुस्तके अशी- १)न आउटलाइन ऑफ इंडियन फोकलोअर २) रिडल इन इंडियन लाईफ ३) लोअर अँड लिटरेचर ४) अ डायजेस्ट ऑफ कंपरेटिव्ह फिलॉलॉजी ५) रोमान्स इन सॅक्रिड लोअर ६) अ प्रायमर ऑफ अँथ्रॉपॉलॉजी ७) अर्लि बुद्धिस्ट ज्युरिस्प्रुडन्स इत्यादी इंग्रजी ग्रंथ, तर ८) हेन्री डेव्हिड थोरो यांच्या ग्रंथांचे मराठी अनुवाद- पैस ९) व्यासपर्व १०) डूब ११) ऋतुचक्र १२) महानदीच्या तीरावर १३) पूर्वा १४) रूपरंग १५) लोक साहित्याची रूपरेखा १६) धर्म व लोकसाहित्य १७) भावमुद्रा १८) केतकरी कादंबरी १९) प्रासंगिका आणि २०) जनतेचा सवाल आदी मराठी पुस्तके आहेत.

दुर्गा भागवत या लोकसंस्कृती आणि लोककलेचे संशोधक म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांनी सुरेख लेखनही केले आहे. त्यांना बौद्ध अभ्यासक, समाजशास्त्रज्ञ आणि मानववंशशास्त्रज्ञ म्हणूनही ओळखले जाते. दुर्गा भागवतजींचा जन्म दि.१० फेब्रुवारी १९१० रोजी इंदूर येथे झाला. त्यांचे शिक्षण मुंबई, अहमदनगर, नाशिक, पुणे अशा विविध ठिकाणी झाले. त्यांनी मुंबईच्या सेंट झेवियर्स कॉलेजमधून सन १९३२मध्ये बीए परीक्षा उत्तीर्ण केली. पुढे सन १९३५ साली त्यांनी एमएची पदवी संपादन केली. शिक्षण घेत असतानाच त्यांनी भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतही भाग घेतला.



शिक्षण पूर्ण केल्यानंतर दुर्गाजींनी पुण्याच्या गोखले इन्स्टिट्यूट ऑफ इकॉनॉमिक्समध्ये समाजशास्त्र विभागाच्या प्रमुख म्हणून दोन वर्षे काम केले.

काही दिवसांनी त्यांनी 'साहित्य सहकार' या मासिकाचे संपादनही केले. त्यांनी लोकसाहित्य आणि मानववंशशास्त्र या विषयांवर विपुल प्रमाणात संशोधनात्मक लेखन केले आहे. या विषयांवरील त्यांचे बरेचसे ग्रंथ इंग्रजीमध्ये आहेत. त्यांनी वैचारिक व समीक्षात्मक लेखनही केले आहे. साने गुरुजींच्या प्रेरणेतून त्या ललित लेखनाकडे वळल्या आणि आपल्या ललित लेखनाद्वारे त्यांनी मराठी साहित्यात मोलाची भर घातली.

दुर्गा भागवत स्वलेखनाच्या कट्टर पुरस्कर्त्या आहेत. त्यासाठी त्यांनी आणीबाणीच्या काळात सन १९७५-७७मध्ये कारावासही भोगला होता. साहित्यिक व विचारवंत यांनी शासकीय पुरस्कार स्वीकारून शासनाचा मिंधेपणा पत्करू नये, असे त्यांचे ठाम व करारी मत होते. अनेक सामाजिक चळवळींतही त्यांचा सहभाग आहे. त्यांच्या 'पैस' या ग्रंथाला 'साहित्य अकादमी' पुरस्कार लाभला आहे. सन १९७५मध्ये कराड येथे भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले होते. अभिजात रसिकता, सौंदर्यासक्ती, जीवनोत्सुक आशाप्रवण वृत्ती, तीव्र संवेदनशीलता, काव्यात्मकता व मर्मग्राही कुतूहल यांचे अपूर्व रसायन त्यांच्या व्यक्तिमत्त्वात असून त्यांच्या साहित्यातही त्याचे प्रतिबिंब पडले आहे. या सर्वांना त्यांचा सखोल व्यासंग व मार्मिक विश्लेषण यांची जोड मिळाली आहे; त्यामुळे त्यांच्या लेखनाला एक आगळा आशय व प्रगल्भता प्राप्त झाली आहे. दुर्गा भागवतजी यांचे निर्वाण दि.८ मे २००२ रोजी मुंबई येथे झाले. त्यांचे साहित्य आज महिला साहित्यिकांना प्रचंड ऊर्जा पुरवित आहे, हे येथे उल्लेखनीय!

!! त्यांच्या गौरवशाली लेखन कौशल्याला जयंतीदिनी विनम्र अभिवादन !!

**संकलक व सुलेखक**
**श्री.एन.कृष्णकुमार, से.नि.शिक्षक.(थोर साहित्यिकांचे चरित्र व साहित्य अभ्यासक.)**
**मु. एकता चौक, रामनगर, गडचिरोली.**
**जि. गडचिरोली, मो. ७७७५०४१०८६.**

# आयोगाच्या निर्णयाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात जाणार -जयंत पाटील

**टेंभुर्णी :** महाराष्ट्रात सामाजिक व आर्थिक अस्थिरता ठेवण्याचे काम केले जात आहे. अगोदर राष्ट्रवादी पक्ष फोडून आमदार पळवले आता जाणीवपूर्वक निर्णय देऊन राष्ट्रवादी पक्ष व चिन्ह दुसऱ्यांना दिले आहे. हे लोकशाहीला घातक असून, या निर्णयाविरुद्ध आम्ही सर्वोच्च न्यायलयात न्याय मागू, असे प्रतिपादन राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केले.टेंभुर्णी (ता. माढा) येथे झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या विजय निश्चय मेळाव्यात श्री. पाटील बोलत होते. पाटील भाषणास उभे राहताच कार्यकर्त्यांनी पक्ष व चिन्हाचा निर्णय विरोधात गेल्याचे सांगितले. यावर प्रतिक्रिया देताना पाटील म्हणाले, जिथे शरद पवार उभे राहतात तेथून पक्ष चालू होतो. शरद पवार म्हणजेच पक्ष आहे. माढा मतदारसंघात शरद पवार ज्या बाजूला असतील त्या बाजूलाच विजय होणार आहे.निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्णयाचा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटावर येणाऱ्या निवडणुकांमध्ये काय परिणाम होईल, असा प्रश्न विचारला असता, राष्ट्रवादी पक्ष स्थापन झाला तेव्हा कुठे लोकांना घड्याळ चिन्ह माहीत होते. लोकांना फक्त शरद पवार माहीत आहेत. त्यामुळे निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्णयाचा कोणताही प्रतिकूल परिणाम होणार नाही असे सांगितले.या विजय निश्चय मेळाव्यात राष्ट्रवादी व काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख, पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष महेश माने, जिल्हाध्यक्ष बळीराम साठे, व्यापारी सेलचे प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे, गणेश पाटील, विठ्ठल सहकारी कारखान्याचे चेअरमन



अभिजित पाटील, शेखर माने,अभयसिंह जगताप, बाळासाहेब पाटील, संजय पाटील-घाटणेकर यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक औदुंबर देशमुख यांनी केले. या मेळाव्यास महेश कोठे, नितीन कापसे, महेश माने, मेहरूम क्षेत्री, प्रमोदिनी लांडगे, भारत जाधव, अरबाज शेख, दयानंद महाडीक आदी उपस्थित होते.या कार्यक्रमातच राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या हस्ते राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. यामध्ये नलिनी चंदेले : महिला प्रदेश उपाध्यक्ष,भरत जाधव : प्रदेश उपाध्यक्ष, सुधीर खरटमल : सोलापूर शहराध्यक्ष, उमर बेरिया : सोलापूर शहर प्रवक्ता, तौफिक शेख : कार्याध्यक्ष सोलापूर शहर, पद्माकर काळे : सोलापूर शहर उपाध्यक्ष, सुनील भोसले : माढा विधानसभा कार्याध्यक्ष, गणेश फावडे : माढा तालुका उपाध्यक्ष यांचा समावेश आहे.

# बालकाच्या पालकांनी एक महिन्याच्या आत संपर्क साधावा


## अन्यथा दत्तक मुक्त घोषित करणार

**चंद्रपूर**-काळजी व संरक्षणाची गरज असलेले १३ वर्षीय बालक रोहित पप्पू यादव तसेच ९ वर्षीय राहुल पावना साहु ही बालके चंद्रपूर बालकल्याण समितीच्या आदेशान्वये, स्वामी विवेकानंद बालगृह, राजुरा येथे दाखल आहे. सदर बालकांनी त्याचा पत्ता चंद्रपूर सांगितल्याने त्यांना चंद्रपूर येथे स्थानांतरण करण्यात आले. जिल्हा बाल संरक्षण कक्षाद्वारे त्या बालकाच्या पत्त्याचा शोध घेतला असता तसेच चौकशी केली असता त्याचे आई-वडील दिलेल्या पत्त्यावर मिळून आले नाही. शेजारी संवाद साधला असता बालकाचे आई-वडील व कुटुंब त्या पत्त्यावर वास्तव्यास नाही अशी माहिती मिळाली.सदर दोन्ही बालकाचे आई-वडील मागील दोन वर्षापासून बालकाच्या भेटीकरीता आले नसल्याने चंद्रपूर, बालकल्याण समिती बालकाला दत्तक मुक्त करणार आहे. सदर बालकाचा ताबा घेण्याकरीता बालकल्याण समिती, शास्त्रीनगर मुल रोड, चंद्रपूर ८४८४०८२२२४, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, सिव्हिल लाईन, जिल्हा स्टेडियम जवळ, चंद्रपूर ८८०६४८८८२२ तसेच स्वामी विवेकानंद बालगृह, राजुरा ७६२०५३०३१७ या भ्रमणध्वनी क्रमांकावर सदर बालकाच्या पालकांनी १ महिन्याच्या आत संपर्क साधावा. अन्यथा सदर बालकास दत्तक मुक्त घोषित करणार असल्याचे जिल्हा बाल संरक्षण अधिकारी अजय साखरकर यांनी कळविले आहे.

# आग विझवणारे पाणी, राजकारण पेटवतय

## मंगळवेढ्यात पुन्हा पेटला पाणी प्रश्न


**मंगळवेढा**- आगामी २०२४ च्या लोकसभेच्या निवडणुकीची चाहूल लागायला सुरवात झाली आहे. निवडणुकीचा कालावधी जसजसा जवळ येत चाललाय तसतशे आग विझवणारे पाण्यामुळे मंगळवेढयात राजकारण पेटत चालले आहे. काही गावांनी निवडणुकीवर बहिष्कार घालण्याची तयारी सुरू केली आहे.तर काही गावातील ग्रामस्थ आमची गावे कर्नाटकाला जोडा अशी मागणी करत आहेत. पाणी प्रश्नावरून विरोधकांनी विद्यमान लोकप्रतिनिधींना घेरण्याची तयारी सुरू केली आहे. दुसरीकडे विद्यमान लोकप्रतिनिधिंनीही आगामी निवडणुकीच्या आत पाणी प्रश्नावर ठोस भूमिका घेतली जाईल अशी भीष्मप्रतिज्ञा केली आहे.दरम्यान २००९ च्या लोकसभेच्या निवडणुकीवर तालुक्यातील ३५ गावांनी बहिष्कार घातला होता. नंतर निवडणुकीचा निकाल तत्कालीन खासदार सुशीलकुमार शिंदेच्या बाजूने लागला. त्यानंतर त्यांनी भाषणात ३५ गावच्या बहिष्काराची चेष्टा केली होती. त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत पाणी प्रश्नावरून भालकेंनी मैदान मारले. सलग तीन वेळा आमदार होऊन सुद्धा व प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या दंडात पाणी आले नाही.त्यानंतर पाण्यासाठी संघर्ष करणाऱ्या ३५



गावांची संख्या २४ गावांवर आली. २०१९ ला भालकेंच्या निधनानंतर मतदारांनी भावनिक साद न ऐकता आवताडेंच्या गळ्यात विजयी माळ टाकली. त्यानंतर पाणी जवळ आलंय म्हणणारी मंडळी विरोधात गेली अन पाणी कुठाय म्हणायला लागली.हेच या पाण्याचे भीषण वास्तव आहे.पाणी प्रश्नाचे राजकीय भांडवल करून राजकारण्यांनी सरपंच, पंचायत समित्या, जिल्हा परिषदा, कारखान्याचे संचालक, मार्केट कमीट्या, खरेदी विक्री संघ, सोसायट्या, जिल्हा नियोजन सदस्य आदी विविध पदांवर सत्ता उपभोगली. पण कधीही न भरणाऱ्या सत्ताधाऱ्यांच्या झोळीत मताचे दान टाकणाऱ्या शेतकऱ्यावर अजूनही शेतात उभा राहून मृगजळाला पाणी समजण्याची वेळ आली आहे. याला सर्वपक्षीय नेते जबाबदार आहेत.खरं तर राजकीय इच्छा शक्ती अभावी मंगळवेढ्यातील शेतकऱ्यांना पाणी मिळत नाही हे वास्तव कुणी नाकारू शकत नाही.दरम्यान, विद्यमान आमदार समाधान आवताडे यांच्याकडे फक्त अडीच वर्षाच्या आमदारकीच्या कामाचा अनुभव आहे. या थोडक्या कालावधीतच उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करून मंगळवेढा उपसा सिंचन योजनेस मुख्यमंत्र्यांनी मंजुरीची सही केली आहे. त्यानंतर ही फाईल मंत्रिमंडळा समोर जाऊन निधी मंजूर होणार आहे. सदरच्या उपसा सिंचन योजनेला आगामी निवडणुकीपूर्वी प्रयत्नाअंती मार्गी लावू, असे मत आवाताडे यांनी व्यक्त केला आहे.

# दहा महिन्यांत १५३ बालकांवर हृदय शस्त्रक्रिया;५३३ इतर शस्त्रक्रियांचाही समावेश

**सोलापूर :** लहान मुलांमधील जन्मजात विकृती, हृदय, किडनीशी संबंधित गुंतागुंतीच्या आजारांवर जिल्ह्यात एप्रिल २०२३ ते जानेवारी २०२४ या दहा महिन्यांच्या कालावधीत एकूण एक हजार ६८६ शस्त्रक्रिया मोफत करण्यात आल्या आहेत. यात १५३ हृदय तर एक हजार ५३३ इतर आजारांवरील शस्त्रक्रियांचा समावेश आहे.राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत १० हजार ते १० लाखांपर्यंत खर्च अपेक्षित हृदय व इतर रोग शस्त्रक्रिया निःशुल्क करण्यात आल्या आहेत. जन्मानंतर काही लहान मुलांमध्ये जन्मतः व्यंग, हृदय, किडनीशी संबंधित आजार, पोषण द्रव्यांची कमतरता, शारिरीक व मानसिक विकासात्मक बदल आढळून येतात.तर हृदयातील छिद्रामुळे फुफ्फुसांकडे होणाऱ्या अतिरिक्त रक्तप्रवाहामुळे श्वास घ्यायला त्रास होणे, धाप लागणे, थकवा जाणवणे, वजन न वाढणे यासारख्या समस्या आढळतात. त्यामुळे अशा मुलांवर शस्त्रक्रिया करणे आवश्यक असते.तर काही मुलांमध्ये दुभंगलेले ओठ, डोळ्यांचा तिरळेपणा, अस्थिरोग आदी जन्मजात विकृतीही आढळतात. त्यामुळे त्यांच्यावर शस्त्रक्रिया करणे गरजेचे असते. त्यामुळे या कार्यक्रमांतर्गत गंभीर आजारांवरील उपचारपूर्व तपासणी व शस्त्रक्रिया केली गेल्याने त्यांना



जीवनदान मिळाले आहे. या योजनेचा गरजूंनी लाभ घ्यावा असे आवाहन बाल स्वास्थ्य मिशनने केले आहे.कोरोना काळात ऑनलाईन अध्यापनामुळे मोबाईल वापरातून मुलांमध्ये दृष्टीदोष वाढले. त्यामुळे चला मुलांनो उजेडाकडे मोहीम राबविण्यात आली. चार पथकांमार्फत डोळ्यांची तपासणी करण्यात आली. त्यात ८०८९ मुलांना दृष्टीदोष असल्याचे आढळून आले. त्यापैकी ८९ मुलांवर नेत्रशस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत.मुलांवरील गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियेसाठी राज्यातील आठ खासगी रुग्णालयांशी सरकारने करार केला आहे. यात मुंबईतील कोकिलाबेन अंबानी हॉस्पिटल, एसआयसीसी चिल्ड्रन हॉस्पिटल, फोर्टिस हॉस्पिटल, पुण्यातील मोरया मल्टिस्पेशालिटी चॅरिटेबल,नागपुरातील नेल्सन मदर अँड चाइल्ड केअर, ऑरेंज सिटी हॉस्पिटल, किंग्जवे हॉस्पिटल यांचा त्यात समावेश आहे. शिवाय स्थानिक महात्मा फुले जनआरोग्य योजना, ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, शासकीय रुग्णालयांत या शस्त्रक्रिया केल्या जातात.जिल्ह्यात राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत एकूण ५२ तपासणी पथके कार्यरत आहेत. या प्रत्येक पथकात एक पुरुष व महिला अशा दोन वैद्यकीय अधिकारी, एक औषध निर्माता व एक आरोग्य सेविका असे चार अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत.त्यांच्याकडून वर्षातून दोनवेळा अंगणवाड्यांतील बालकांची तर एकदा शाळांतील सहा ते १८ वयोगटातील मुलामुलींची तपासणी केली जाते. २०२३ -२४ वर्षात ४७५९ अंगणवाड्यांतील तीन लाख ३३ हजार ८०७ बालकांची तर शाळांतील सहा लाख ३३ हजार २९२ मुलांची तपासणी करण्यात आली आहे.राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमासाठी आरबीएसके डॉक्टर अथवा जिल्हा रुग्णालयात संपर्क साधावा. या उपचारासाठी शून्य ते १८ वयोगटातील सर्व मुले पात्र आहेत. त्यासाठी बालकाचा शाळेचा दाखला, डॉक्टरांचे शस्त्रक्रियेचे अंदाजपत्रक आणि जिल्हा शल्यचिकित्सकांची मंजुरी लागते.

# अंगणवाडी सेविकांना मोबाईल नाही,पण रिचार्जची रक्कम मिळाली!

## ५ वर्षे जुनाट मोबाईलवरच कामकाज; डिसेंबर-जानेवारीचे अजूनही मिळाले नाही मानधन



**सोलापूर :** जिल्ह्यात चार हजार ७३० अंगणवाडी सेविका असून त्यांना 'पोषण ट्रकर'वर दररोजची माहिती अचूक भरता येईल, यासाठी २०१८ मध्ये नवीन न्ड्राईड मोबाईल देण्यात आले. साडेपाच वर्षांपूर्वीचे बहुतेक मोबाईल बंद पडले, तरीदेखील शासनाकडून त्यांना नवीन मोबाईल मिळालेला नाही. कामबंद आंदोलनानंतर सर्वांनाच नवीन मोबाईल देण्याची ग्वाही मिळाली, काही ठिकाणी वाटप देखील झाले. मात्र, सोलापूर जिल्ह्यात सेविकांना अद्याप मोबाईल मिळालेले नाहीत, हे विशेष.तीन ते ६ वर्षांपर्यंतच्या चिमुकल्यांना शिक्षणाची गोडी लागावी, त्यांचे आरोग्य सुदृढ राहावे यासाठी गावोगावी अंगणवाड्या सुरू झाल्या. २०१८ पासून पोषण ट्रॅकर पच्या माध्यमातून अंगणवाडी कधी उघडली व बंद केली, चिमुकल्यांची उपस्थिती, आहार वाटप, गावातील गर्भवती महिला, सहा महिन्यांपर्यंतच्या स्तनदा मातांची माहिती दरमहा त्या पवर ऑनलाइन भरावी लागते.कुपोषित बालके व त्या सर्वांना दिलेला आहार, याचीही माहिती त्यातून शासनाला कळविली जाते. माहिती भरण्यासाठी होणारा मोबाईलचा दररोजचा वापर आणि मोबाईल दिल्याचा कालावधी, यातून बहुतेक मोबाईल बंद पडले असतील याचा अंदाज येतो. मात्र, मोबाईल तुमचा आणि रिचार्ज आमचा' असा अलिखित नियम करून सध्या अंगणवाडी सेविकांकडून काम करून घेतले जात असल्याची वस्तुस्थिती आहे. सेविका- मदतनीस कर्मचाऱ्यांनी ५२ दिवस कामबंद आंदोलन करूनही शासनाकडून नवीन मोबाईल मिळालेले नाहीत हेही विशेषच. अंगणवाडी सेविकांना 'पोषण ट्रॅकर'वर माहिती भरण्यासाठी शासनाकडून दरवर्षी रिचार्जला दोन हजार रुपये दिले जातात. एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ पर्यंतच्या रिचार्जची रक्कम शासनाकडून वितरित करण्यात आली आहे. पण, मोबाईलच नाहीत तर रिचार्ज करायचा कसा हा मुख्य प्रश्न सेविकांसमोर आहे. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर कुपोषित बालके, अंगणवाड्यांसह घरी असलेली सहा महिने ते तीन वर्षांपर्यंतची बालके, स्तनदा माता, गर्भवती महिलांची माहिती नियमित भरावीच लागणार आहे. त्यामुळे शासनाकडून कधीपर्यंत मोबाईल मिळणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.अंगणवाडी सेविका व मदतनीस कर्मचाऱ्यांनी विविध मागण्यांसाठी डिसेंबर २०२३ ते जानेवारी २०२४ या काळात कामबंद आंदोलन केले होते. संपावर तोडगा काढताना संप काळातील मानधन देण्यासंदर्भात पर्याय संघटनांनी सुचविला होता. पण, अजूनही मागील दोन महिन्यांचे मानधन सेविका व मदतनीस महिलांना मिळालेले नाही. सरकारच्या सकारात्मक निर्णयाकडे सोलापूरसह राज्यातील दोन लाखांहून अधिक महिला कर्मचाऱ्यांचे लक्ष लागले आहे.

## आण्णा वॉरियर्सने पटकावला नमो चषक पाटोदा प्रिमियर लीग पर्व-५ ची सांगता

# आपली भावी पिढी सुदृढ व निरोगी राहण्यासाठी मुलांना मोबाईल पासुन दुर ठेवून खेळाकडे वळवावे-आ.धस

## आ.सुरेश आण्णा धस यांच्या हस्ते विजेत्या स्पर्धकांना बक्षीस वितरण

**पाटोदा । प्रतिनिधी**

माजी मंत्री तथा बीड/लातूर/ धाराशिव विधान परिषद सदस्य आमदार सुरेश आण्णा धस यांच्या वाढदिवसा निमित्त व भारत देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या संकल्पनेतून आणि भाजप युवा मोर्चाच्या वतीने नमो चषक-२०२४ अंतर्गत आयोजित पाटोदा प्रीमियर लीग- ५ या पर्वाचा दिनांक०७ फेब्रवारी बुधवारी रोजी समारोप झाला. या वेळी विजेत्या संघांना, आणि उत्कृष्ठ खेळाडूंना पारितोषिक देवून खेळाडुचे आमदार सुरेश आण्णा धस यांनी कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या पाटोदा प्रीमियर लीग पर्व-५ मध्ये एकूण १० संघांनी सहभाग नोंदवला होता. सर्व संघ अतिशय चांगले खेळले बुधवारी झालेल्या अंतिम सामन्यात अंमळनेर जिल्हा परिषद गटाचे भाऊसाहेब भवर यांच्या आण्णा वॉरियर्स संघाने प्रथम पारितोषिक मिळवले, तर सभापती वॉरियर्स मुगगाव संघाने द्वितीय पारितोषिक पटकावले. तसेच शिवक्रांती योध्दा या संघाने तृतीय पारितोषिक तर चतुर्थ पारितोषिक त्रिमूर्ती चॅलेंजर्स या संघाने पटकावले. पाटोदा प्रीमियर लीग पर्व-५ नमो चषकाचा अंतिम सामना पाहण्यासाठी बीड/लातूर/धाराशिव विधान परिषद सदस्य आमदार सुरेश आण्णा धस स्वतःउपस्थित होते. पाटोदा प्रीमियर लीग पर्व-५ नमो चषक पारितोषिक वितरण सोहळयास आमदार सुरेश आण्णा धस, पाटोदा पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अनमोल केदार, बीड जिल्हा परिषदेचे माजी सभापती महेंद्र गर्जे, अँड.जब्बार पठाण पाटोदा नगरपंचायतचे नगराध्यक्ष राजुभैय्या जाधव, उपनगराध्यक्ष शरद बामदळे, नगर पंचायत माजी सभापती संदीप जाधव सह पाटोदा नगर पंचायतचे सभापती व सर्व नगरसेवक, इतर पदाधिकारी यांच्या सह तालुक्यातील विविध मान्यवर व मोठ्या संख्येने क्रिकेट प्रेमी नागरीक, खेळाडू उपस्थित होते.



# आदर्श विद्यालयाचा स्नेहसंमेलनाचा समारोप



**सिंदखेड राजा । प्रतिनिधी**

शिक्षण प्रसारक मंडळ चिखली द्वारा संचालित आदर्श विद्यालय येथील तिन दिवसीय स्नेसंमेलनाचा समरोप व बक्षीस वितरण सोहळा माननीय श्री प्रेमराजजी भाला सचिव, शिक्षण प्रसारक मंडळ, चिखली यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. यावेळी मा. श्री. गोपालजी बोरा सर संचालक शि.प्र.मं चिखली मा. श्री .राजेंद्रजी उमाळे सर विदर्भ प्रांत संयोजक कुटुंब प्रबोधन ,मा. श्री पद्माकर गवई पं.स, मा.श्री प्रवीणजी मेरटकर पं स तसेच मा. सौ .नंदाताई मेहेत्रे माजी नगराध्यक्षा, मा. श्री. संगीताताई आढाव स्था.सल्लागार मा. श्री सुभाषजी मोरे सर मुख्याध्यापक, आदर्श विद्यालय ,मा. संदीप चौधरी सर प्रभारी प्राचार्य, सौ शितल बोंद्रे मॅडम मुख्याध्यापक आदर्श कॉन्व्हेंट आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर प्रमुख अतिथींचे शाल-श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक श्री . संदीप चौधरी सरांनी केले. त्यानंतर शाळेत घेतलेल्या विविध स्पर्धां मधील विजयी स्पर्धकांना बक्षीस व प्रमाणपत्र देऊन गुणगौरव करण्यात आला. त्यानंतर श्री राजेंद्रजी उमाळे सरांनी विजयी स्पर्धकांना व उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. कल्पना गोरे मॅडम यांनी केले तर आभार ज्योती माने मॅडम यांनी मानले. संपूर्ण कार्यक्रमास विद्यार्थी व पालक यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक वृंदांनी अथक परिश्रम घेतले.

## अनुसूचित जाती उद्योजकांसाठी मिटकॉन मार्फत निवासी उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम

### प्लास्टिक ब्लो मोल्डींग व कॅड कॅम या विषयावर नि:शुल्क प्रशिक्षण

**चंद्रपूर-** मिटकॉन कन्सलटन्सी न्ड इंजिनियरींग सर्व्हिसेस लिमीटेड, चंद्रपूर आणि उद्योग संचालनालय यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील अनुसूचित जातीतील युवक-युवतींसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर विशेष सामूहिक प्रोत्साहन योजनेतंर्गत ४५ दिवसीय निवासी तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम नि:शुल्क स्वरुपात राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमातंर्गत प्लास्टिक ब्लो मोल्डींग व कॅड कॅम या विषयावर नि:शुल्क प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

सदर प्रशिक्षण कार्यक्रमाची माहिती अनुसूचित जातीच्या उमेदवारांना देण्यासाठी १२ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता समाजकल्याण सभागृह, शासकीय दूध डेअरी समोर, जलनगर वॉर्ड, चंद्रपूर येथे एक दिवसीय उद्योजकता परिचय मेळावा तसेच प्रशिक्षणार्थ्यांच्या प्रत्यक्ष मुलाखतीचे आयेजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात उद्योजकीय व्यक्तिमत्व विकास, उद्योग उभारणी, विविध क्षेत्रातील उद्योगसंधी, उद्योगांना भेटी, उद्योग निवड प्रक्रिया, विक्री व व्यवस्थापन कौशल्य, उद्योगाला लागणारे विविध नोंदणी व परवाने या व्यतिरिक्त निधी उभारण्याकरीता केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांची माहिती या कार्यक्रमामध्ये दिली जाणार आहे.इच्छुक उमेदवारांनी नोंदणीकरीता मिटकॉन कन्सल्टन्सी न्ड इंजिनियरींग सर्व्हिसेस लिमीटेड चंद्रपूर द्वारा, जिल्हा उद्योग केंद्र, उद्योग भवन, चंद्रपूर येथे संपर्क साधावा. तसेच मेळाव्याला येताना मुलाखतीकरीता कागदपत्रांची सत्यप्रत घेऊन येणे आवश्यक आहे. अधिक माहितीकरीता मुख्य प्रशिक्षक (मो.९८२२७०७८४८), कार्यक्रम समन्वयक लक्ष्मी खोब्रागडे (मो. ९३०९५७४०४५), गुणवंत वाटेकर (मो.७७०९२९१०१८) यांच्याशी संपर्क करावा, असे आवाहन मिटकॉनचे संतोष लंके यांनी केले आहे.

## दीनदयाल विद्यालय,कनिष्ठ महाविद्यालय तथा ज्ञानपीठाच्या स्नेहसंमेलनाच्या तिसऱ्या दिवशीही भरगच्च कार्यक्रम



**सिंदखेड राजा । प्रतिनिधी**

०८ फेब्रुवारी २०२४ रोजी सादर झालेल्या क्रिडा आणि सांस्कृतिक कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी जेष्ठ शिक्षक श्री.आर.बी. काकड सर, प्रमुख पाहुणे म्हणुन,शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक श्री. गोपालजी बोर,बाबासाहेब मिनासे,छबुरावजी भावसार, प्राचार्य श्री.एस.बी गारडे सर,पर्यवेक्षक श्री.एस.एन.व्यास सर आदी उपस्थित होते.दरम्यान बोलतांना श्री.उमाळे सर यांनी निरोगी व सुदृढ शरीरासाठी विद्यार्थ्यांनी मोबाईल मध्ये न गुंताता विविध खेळ खेळावेत तसेच नियमित व्यायाम करावा असे आवाहन केले त्याचबरोबर श्री.राठोड सर यांच्या आग्रहास्तव सोबत एक गीत गाऊन उपस्थितांचे मने जिंकली,तसेच संचालक श्री.गोपालजी बोरा यांनी विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्त्व विकासाच्या दृष्टीने बहुमोल मार्गदर्शन केले.त्यानंतर मान्यवरांच्या उपस्थितीत,श्री.राठोड यांच्या नियोजनानुसार विविध क्रीडा स्पर्धा पार पडल्या. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. नंदकुमार वायाळ सर, सूत्रसंचालन श्री.ए.एस.दंदाले यांनी केले आणि श्री संतोष खुळे सर यांनी उपस्थितांचे आभार मानले तर दुपारी सादर झालेल्या ज्ञानपीठाच्या विविध संस्कृतीक कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राठोड मॅडम आणि गव्हाणे मॅडम यांनी केले.या प्रसंगी संस्थेचे संचालक मंडळाचे सदस्य श्री.सुहासजी जामदार, डॉ.भूषणजी डागा आदी उपस्थित होते.

# आष्टी मतदारसंघात १०० कोटी रु.किंमतीच्या को.प. बंधाऱ्यांची कामे मंजूर-आ.बाळासाहेब आजबे

**आष्टी-**भाजपा शिवसेनेच्या महायुती सरकारमध्ये सत्तेत सहभागी होण्याचा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचा निर्णय अत्यंत योग्य ठरला असून आष्टी विधानसभा मतदारसंघ मध्ये सध्या ९८ कोटी रुपये किमतीच्या कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांची कामे मंजूर असून ३० कोटी रू. किमतीच्या बंधार्यांची कामे मंजूर असून आणखी १० कोटी रू.ची कामे मंजुरीच्या स्तरावर आहेत म्हणजे आष्टी विधानसभा मतदारसंघांमध्ये शंभर कोटी रू.पेक्षा जास्त किमतीचे कोल्हापुर पद्धतीचे बंधारे मंजूर करण्यामध्ये आपण महाराष्ट्र राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे.. त्यामुळे राज्यातील भा.ज.पा शिवसेना या महायुतीच्या सत्तेत सहभागी होण्याचा निर्णय अत्यंत योग्य ठरला आहे असे प्रतिपादन आ.बाळासाहेब आजबे यांनी केलेआष्टी तालुक्यातील साबलखेड आणि शिरापूर येथील कोल्हापूर पद्धतीच्या बंधार्याच्या लोकार्पणानंतर कानडी खुर्द येथील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाराच्या लोकार्पण प्रसंगी ते बोलत होते. यावेळी माजी जि.प. सदस्य सतीश शिंदे, परमेश्वर शेळके, काकासाहेब शिंदे, हरिभाऊ दहातोंडे, धैर्यशील थोरवे, उप अभियंता प्रशांत काकडे उपस्थित होते..

आ.बाळासाहेब आजबे पुढे म्हणाले की, आष्टी पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील ज्या ज्या ठिकाणी कोल्हापूर पद्धतीचे बंधारे बांधकाम करण्यायोग्य जागा उपलब्ध असतील त्या त्या ठिकाणी बंधारे बांधण्यात येतील या बंधार्यांमधील आडणाऱ्या पाण्यामुळे बंधाऱ्याभोवती असणाऱ्या शेतकऱ्यांना मोठा फायदा होत असल्याचे दिसून येत आहे त्यामुळे जास्तीत जास्त पाणी अडवून साठवण करण्याची आवश्यकता आहे साबलखेड, शिरापूर आणि कानडी खुर्द येथील कोल्हापूर पध्दती बंधार्यांची कामे मोठी असून त्यासाठी ठेकेदार देखील कामाची माहिती असलेले दर्जेदार कामे करणारे आणि मशिनरी उपलब्ध असणारे असल्यामुळे त्यांच्याकडून दर्जेदार काम करून घेण्याची जबाबदारी प्रत्येक गावकऱ्यांची असून कामावर लक्ष लक्ष ठेवावे असे सांगत ते म्हणाले की, अशा प्रकारची कामे वारंवार होत नसतात एकदा निकृष्ट दर्जाचे काम



झाल्यानंतर पाण्याची गळती होत असल्यामुळे शेतकऱ्याचे आणि पर्यायाने शासनाचे फार मोठ्या नुकसान होत असते त्यामुळे छोट्या छोट्या स्थानिक ठेकेदारांऐवजी मोठ्या ठेकेदारांना हे काम देण्यात आले आहे असे सांगितले आपण आमदार झाल्यापासून गेली चार वर्ष सतत मेहेकरी धरणांमध्ये सीना प्रकल्पातील पाणी आणून धरण भरल्यामुळे लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर फायदा झाला परंतु यावर्षी सीना धरणांमध्येच पुरेसे पाणी न आल्यामुळे यावर्षी मेहेकरी धरण भरून घेताना आल्यामुळे यावर्षी पाणीसाठा कमी दिसून येत आहे खुंटेफळ साठवण तलावा मध्ये शिंपोरा येथून थेट बंदिस्त जलवाहिनी कामामुळे कुठेही गळती न होता संपूर्ण पाणी खुंटेफळ साठवून तलावात येणार आहे..१.६८ टीएमसी पाणी सुरुवातीस आपणास मिळणार असल्यामुळे तेवढ्याच पाणीसाठ्यासाठी सध्या काम चालू असून भविष्यात आणखी ४.०० टीएमसी पाणी आपणास मिळणार आहे त्यासाठी सर्वांनी प्रयत्न करण्याची आवश्यकता असून त्यानंतर तालुक्यातील अनेक तलावांमध्ये ते पाणी सोडण्यात येणार आहे आपण शेतकरी पुत्र असल्यामुळे दुष्काळी आष्टी तालुका पाणीदार करण्यासाठी आपण प्रयत्न करत असून तालुक्यातील सर्व ठिकाणी पाणी आणि रस्त्यांची कामे तसेच गाव अंतर्गत रस्त्यांची कामे व्हावीत त्यातून गावकऱ्यांच्या हिताची कामे करण्यासाठी आपण प्रयत्न करत राहू असे शेवटी त्यांनी सांगितले.. यावेळी बोलताना माजी जि.प.सदस्य सतीश शिंदे म्हणाले की, आ. बाळासाहेब आजबे यांचे पिताश्री भाऊसाहेब आजबे आमदार असताना त्यांनी मेहेकरी धरणाचे काम केले असून बाळासाहेब आजबे यांना देखील शेतीची आवड असल्यामुळे त्यांनी कोल्हापूर पद्धतीचे बंधारे सिमेंट नाला बंधारे आणि कृषी विभागामार्फत फळझाडे व इतर योजना मतदारसंघांमध्ये यशस्वी करून दाखवल्या आहेत असे सांगितले.. यावेळी बोलताना युवा नेते धैर्यशील थोरवे म्हणाले की, आ.बाळासाहेब आजबे हे शेतकरी पुत्र असून मागणीप्रमाणे सर्व ठिकाणी बंधारे आणि शेतकऱ्यांच्या हिताची असलेल्या शंभर कोटी रुपयांची बंधार्यांची कामे केली आहेत ही विशेष बाब असल्याचे त्यांनी सांगितले.आज मतदारसंघातील आष्टी तालुक्यातील तीन ठिकाणी एकूण ४कोटी ९५ लाख रु.किमतीची कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्याचे लोकार्पण आ. बाळासाहेब आजबे आणि मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले . यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष सतिष आबा शिंदे, पंचायत समिती सदस्य परमेश्वर काका शेळके, धैर्यशील थोरवे काकासाहेब शिंदे, राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष भाऊसाहेब घुले, महेश आजबे, पंचायत समिती सभापती संतोष गुंड, हरिभाऊ दहातोंडे, नामदेव मामा शेळके, सुनील दादा नाथ, महादेव डोके काकडे साहेब, एकनाथ जाधव,डॉ गव्हाणे सरपंच चंद्रभान वामन, सरपंच शिवाजी बुंरुगुले,शरद देसाई, सरपंच भिमराव बोडखे, सरपंच शिवाजी गायकवाड ,गोकुळ सवासे, दिलीप चव्हाण,राम गोंदकर नगरसेवक नाजिम शेख, सोमा कर्डिले, सुभाष वाळके शामराव फसले, बिबिशन कवडे सर, अर्जुन काकडे, कल्याण घोंगडे, नाजिम शेख, भाऊसाहेब चौधरी, बलभीम काळोखे, अदिनाथ फसले, बबलु शेख,नितीन मिसाळ,संजय गुंड, पाटील जगताप, महादेव मामा जगताप, सरपंच कारभारी गव्हाणे, सरपंच संभाजी गाडे, गोविंद इथापे,भाऊसाहेब खराडे, समदपठाण, उपसरपंच पवन तरटे, शिवदास नन्नवरे,जालिंदर हाके, डॉ पवने,संदिप देवकर, कॉन्ट्रॅक्टर कर्डिले साहेब, शशिकांत मिसाळ, शाखा अभियंता सुरेश मुंडे, पत्रकार प्रफुल्ल भाऊ सहस्रबुद्धे, उत्तम बोडखे, रघुनाथ कर्डिले, संतोष सानप,शरद तळेकर,शरद रेडेकर संदिप जाधव व इतर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मातृशक्ती वाढवतेय चंद्रपूर जिल्ह्याचा गौरव

# सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार

## घुग्घुस येथे मकर संक्राती सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन;प्रसिद्ध सिनेअभिनेत्री तेजश्री प्रधान यांची उपस्थिती

**घुग्घुस । प्रतिनिधी**

'महाराष्ट्राचे वर्णन कायम 'चांद्यापासून बांद्यापर्यंत' असे केले जाते. हा महाराष्ट्र चांद्याशिवाय अपूर्ण आहे. आणि या चंद्रपूर जिल्ह्याची शान वाढविण्याचे, या जिल्ह्याचा गौरव वाढविण्याचे काम मातृशक्ती करीत आहे. त्यात घुग्घुसचे योगदान मोठे आहे,' असे गौरवोद्गार काढत वने व सांस्कृतिक कार्य मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी 'घुग्घुस की नारी हर बात मैं भारी' या शब्दांत कौतुकही केले.

घुग्घुस येथील प्रयास सखी मंचतर्फे ना.सुधीर मुनगंटीवार क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवांतर्गत मकर संक्रांती उत्सव व सांस्कृतिक कार्यक्रम तथा महिला संमेलनाचे आयोजन गुरुवारी (दि.८ फेब्रुवारी) करण्यात आले. केमिकल नगर येथील प्रयास सभागृहात आयोजित या कार्यक्रमाला सिने अभिनेत्री तेजश्री प्रधान यांची उपस्थिती आकर्षणाचे केंद्र ठरली. यावेळी राजुरा विधानसभा प्रमुख तथा माजी जि. प. अध्यक्ष देवराव भोंगळे, प्रदेश उपाध्यक्ष भाजयुमो विवेक बोढे, भाजपा महानगर अध्यक्ष राहुल पावडे, वेकोली चे महाव्यवस्थापक आभास सिंह, लॉयड मेटल प्लांट हेड संजय कुमार, पवन मेश्राम, प्रयास सखी मंचच्या मुख्य मार्गदर्शिका अर्चना भोंगळे, प्रयास सखी मंचच्या



अध्यक्ष किरण बोढे, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन मंडळाचे सदस्य प्रकाश धारणे, नीतू चौधरी, वैशाली ढवस, सुचिता लुटे, सुषमा सावे, नंदा कांबळे, निरीक्षण तांड्रा, संतोष नुने, संजय तिवारी, सिनू इसारप, साजन गोहने, विनोद चौधरी, अमोल थेरे, हसन शेख, रत्नेश सिंग आदी उपस्थित होते. ना. सुधीर मुनगंटीवार म्हणाले, 'चंद्रपूर ही वाघ आणि वाघिणीची भूमी आहे. आज तेजश्री प्रधान यांच्या रुपाने अभिनयातील वाघीण आपल्या दर्शनासाठी आली आहे. या सोहळ्याला नजर जाईल तेथवर मातृशक्ती दिसत आहे. इथे गर्दी आहे आणि दर्दीही आहेत. घुग्घुसवर मी जेवढे प्रेम केले, त्यापेक्षा जास्त प्रेम मला येथील नागरिकांनी दिले. गेल्या वर्षभरात मी अनेक चित्रपटांना अनुदान दिले. पण आज येथील मातृशक्तीने सादर केलेले नृत्य, त्यांनी सादर केलेल्या कला बघून, येथील कलावंतांना सोबत घेऊनच एखादा चित्रपट करावा की काय, असा विचार माझ्या मनात आला. घुग्घुस येथील माता-भगिनींसह सर्व नागरिकांना खूप आनंदी ठेवावे, अशी प्रार्थना मी परमेश्वराकडे करतो.' यावेळी त्यांनी देवराव भोंगळे आणि विवेक बोढे यांच्या शिस्तबद्ध आयोजनाचे कौतुक करत यांच्या सारखे कार्यकर्ते मिळाल्याने मी स्वतःला नशीबवान समजतो, अशी उत्स्फूर्त प्रतिक्रिया व्यक्त केली.

### सुधीरभाऊंचे काम बघून अभिमान वाटला – तेजश्री प्रधान

चंद्रपूर जिल्ह्यात आल्यानंतर सुधीरभाऊंच्या कामाचा अवाका आणि व्याप कळला. वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमांची झलक इथे बघायला मिळाली. त्यामुळे हा जिल्हा खूप चांगल्या हातांमध्ये असल्याचा मला अभिमान वाटतो, अशी भावना सिने अभिनेत्री तेजश्री प्रधान हिने व्यक्त केली. 'आम्ही टीव्हीवर येतो. मोठा प्रेक्षकवर्ग आम्हाला बघत असतो. पण आज एवढा मोठा प्रेक्षकवर्ग घुग्घुसमध्ये प्रत्यक्षात बघायला मिळाला, त्यासाठी मी सुधीरभाऊंचे आभार मानते. सगळ्या महिला घरचा सोहळा असल्याप्रमाणे इथे आलेल्या आहेत. यावरून आपल्या कामातून आपण किती लांबपर्यंत पोहोचत असतो, याची प्रचिती आली. त्याचवेळी महाराष्ट्राच्या प्रत्येक कोपऱ्यात इतके छान काम सुरू आहे, याचा आनंद वाटतो,' असेही त्या म्हणाल्या. कुठलेही चांगले काम करण्यासाठी चेतनेची ठिणगी लागत असते. सुधीरभाऊ ही ठिणगी होऊन आपल्या सर्वांच्या पाठिशी आहेत, याचा आनंद असल्याचे तेजश्री प्रधान म्हणाल्या.

## बाबा आमटे यांच्या स्मृतिदिनाप्रित्यर्थ आनंद निकेतन कृषी महाविद्यालयातर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन

**वरोरा । प्रतिनिधी**

आनंद निकेतन कृषी महाविद्यालय वरोरा राष्ट्रीय सेवा योजना , राष्ट्रीय छात्र सेना व कस्तुरबा रक्तपेढी सेवाग्राम यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ०९ फेब्रुवारी रोजी आनंदवन येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

रक्तदान शिबिराची सुरुवात उद्घाटनपर कार्यक्रमाने झाली.या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून कस्तुरबा ब्लड बँकेंचे प्रमुख डॉ.हिमांशी जैन, डॉ. पोळ, विश्वस्त, म.से.स., सुधाकर कडू गुरुजी विश्वस्त म.से.स. तसेच डॉ सुहास पोतदार(प्राचार्य,आनंद निकेतन कृषी महाविद्यालय) यांनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहून उपस्थितांना श्रद्धेय बाबांच्या समाजसेवी कार्याबद्दल माहिती सांगून बाबांनी दिलेला सेवेचा वारसा आपण एक विद्यार्थी



कार्यकर्ता म्हणून पुढे चालविणे गरजेचे आहे असे प्रतिपादन केले.तसेच विद्यार्थ्यांना रक्तदानाबद्दल मार्गदर्शन करून प्रोत्साहित केले. शिबिरात एकुण ३८ रक्तदात्यांनी रक्तदान केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंजली तितिरमारे हिने केले. सदर रक्तदान शिबिराकरिता कस्तुरबा रक्तपेढी सेवाग्राम टीम तसेच सीतारतन व साईबाबा हॉस्पिटल,आनंदवन यांचे विशेष सहकार्य लाभले. या कार्यक्रमाचे आयोजन व यशस्वितेकरिता डॉ. मनोज जोगी, कार्यक्रम अधिकारी राष्ट्रीय सेवा योजना, रासेयो समिती सदस्य शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी इत्यादींनी विशेष परिश्रम घेतले.

## जंगी शंकरपटाचे थाटात उद्घाटन

**पुलगाव । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात क्रमांक तीन वर्धा जिल्ह्यात एक नंबर वर असलेल्या नाचणगाव येथील सिद्धेश्वर कृषक मंच द्वारा आयोजित तीन दिवसीय जंगी शंकर पटाचे उद्घाटन आमदार रणजीत कांबळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळेस प्रमुख पाहुणे म्हणून उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल चव्हाण, तहसीलदार दत्तात्रय जाधव, पुलगाव पोलीस स्टेशनचे ठाणेदार प्रमोद बनबले, सरपंच ड.निलीमा राऊत,कृषक मंच अध्यक्ष राजेंद्र कोचर हे होते.

यावेळी उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते शेतकऱ्यांचे आराध्य दैवत असलेल्या बलराम व सिद्धेश्वराच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना दिनकर ओक यांनी शंकरपटाची रूपरेषा समजावून सांगितली. यावेळी बोलताना आमदार कांबळे यांनी बरेच वर्षापूर्वी आपण कोटेश्वर येथे शंकर



पटाचे आयोजन करत होतो.त्यानंतर मध्यंतरीच्या काळात शंकरपटाचे आयोजन बंद करण्यात आले होते. त्यानंतर कोर्टाच्या आदेशानुसार शंकर पटाचे आयोजन नियमाचे पालन करून सुरू करण्यात आले. शेतकऱ्यांसाठी शंकर पट मोठा उत्साहाचा विषय आहे व ती परंपरा बऱ्याच वर्षापासून सुरू आहे.वर्धा जिल्ह्यात हळूहळू मोठ्या प्रमाणात शंकरपटाचे आयोजन करण्यात येऊ लागले आहे.प्राण्यांच्या शरीराला कुठल्याही प्रकारची दुखापत होणार नाही, याची आयोजकांनी दक्षता घ्यावी, हे सांगितले. यावेळेस सुरेश देवतळे,दिलिप अग्रवाल, प्रमोद वंजारी,गिरीश मोकाती,संजय पाटील,प्रवीण सावरकर,सुनील नागतोडे,अनंता नावाडे,अजय खरोडे, अनिल नावाडे,विक्रांत मेहेकरे,गजानन उमक यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन मोहन नावाडे तर आभार देवानंद गायधनी यांनी मानले.

## कृषी महाविद्यालयात गिरवले रोपवाटीका तंत्रज्ञानाचे धडे

**आनंदवन । प्रतिनिधी**

महारोगी सेवा समिती संचालित आनंद निकेतन कृषी महाविद्यालय, वरोरा, येथे महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ पुणे, आ.नि.कृ.म, वरोरा आणि कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आनंद निकेतन कृषी महाविद्यालय वरोरा मध्ये राष्ट्रीय फलोउत्पादन मंडळ – एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान अंतर्गत फळे व भाजीपाला रोपवाटीका तंत्रज्ञान या निःशुल्क व निवासी शेतकरी प्रशिक्षणाचे आयोजन दि ७ ते ९ फेब्रुवारी दरम्यान करण्यात आले होते.

प्रशिक्षणाचे उद्घाटन दिनांक ०७ फेब्रुवारीला प्राचार्य डॉ. सुहास पोतदार, सुशांत लवटे उपविभागीय कृषी अधिकारी वरोरा, सूचित लकडे, विषय विशेषज्ञ, कृषी विज्ञान केंद्र गडचिरोली, मिली पुसदेकर, सहाय्यक प्राध्यापक ( उद्यानविद्या) यांच्या उपस्थितमध्ये संपन्न झाले . सदर प्रशिक्षणात चंद्रपूर जिल्ह्यातील एकूण २८ प्रशिक्षणार्थींनी सहभाग घेतला. सदर प्रशिक्षणात रोपवाटीका व्यवसाय संधी व आव्हाने, रोपवाटिकेतील माध्यमे व त्यांचे निर्जंतुकीकरण, प्रमुख फळे व भाजीपाला पिके यांचे रोपवाटीका व्यवस्थापन, रोपवाटिकेतील पीक संरक्षण, पोषण व्यवस्थापण, रोपवाटीकेसाठी शासनाच्या विविध योजना, रोपवाटीकेसाठी शासकीय परवाना विषयावर मार्गदर्शन करण्यात आले.यासोबतच या प्रशिक्षणात



भाजीपाला रोपवाटीकेत वाफे तयार करून ते निर्जुंतुक करणे, प्रो ट्रे रोपवाटीका तयार करणे, आंबा, पेरु इ फळपिकांचे विविध पध्दतीने कलम तयार करणे याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. या प्रशिक्षणात सूचित लकडे, विषय विशेषज्ञ (उद्यानविद्या), कृषी विज्ञान केंद्र गडचिरोली, डॉ . सुहास पोतदार, प्राचार्य, आ नि कृ म वरोरा, मिली पुसदेकर, डॉ प्रशांत राखोंडे, नितीन गजभे, अनिल भोगावे, सहायक प्राध्यापक, आ. नि. कृ. म, वरोरा, मारुती वरभे, कृषि अधिकारी, वरोरा, या तज्ञांनी मार्गदर्शन केले. प्रशिक्षणा अंतर्गत आनंदवन फळबाग प्रक्षेत्र, तालुका फळरोपवाटिका एकर्जूना, महविद्यालयातील सेंद्रिय शेती निविष्ठा उत्पादन केंद्र याठिकाणी क्षेत्रीय भेटीचे आयोजन करण्यात आले होते.तीन दिवसीय प्रशिक्षण अत्यंत उत्साहात पार पडले तसेच प्रशिक्षणार्थींनी या प्रशिक्षणाबाबतीत समाधान व्यक्त केले. प्रशिक्षणाच्या समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास पोतदार , यांनी भूषविले तसेच प्रमुख अतिथी म्हणून सुधाकर कडू, विश्वस्त महारोगी सेवा समिती वरोरा, व प्रशिक्षण कार्यक्रम संयोजिका मिली पुसदेकर हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन हे डॉ. अनिल भोगावे यांनी केले.

## कारागृहातील बंद्यांसाठी बायोमेट्रिक टच स्क्रीन सुविधा

### जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते उद्घाटन, अद्ययावत पाकगृहाचे भूमिपूजन



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

भारत सरकारच्या उपक्रमातंर्गत आय.सी.जे.एस (ICJS) या प्रकल्पाच्या माध्यमातून कारागृहातील बंदयांच्या सोयी-सुविधेत वाढ करण्यासाठी बायोमेट्रिक टच स्क्रिन किऑस्क (Biometric Touch Screen Kiosk) मशिनचे उद्घाटन तसेच कारागृहातील अद्ययावत पाकगृहाचे भूमिपूजन जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्या हस्ते पार पडले.

जिल्हा कारागृह येथे पार पडलेल्या कार्यक्रमाला मुख्य न्यायदंडाधिकारी शेखर गोडसे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव सुमित जोशी, कारागृह अधीक्षक अनुपकुमार कुमरे, वरिष्ठ तुरूंगाधिकारी सतिश सोनवणे, कार्यकारी अभियंता मुकेश टांगले, उपविभागीय अभियंता व्ही.आर.अंबुले, कनिष्ठ अभियंता रूपेश चेंदे आदी उपस्थित होते.बायोमेट्रीक टच स्क्रिन किऑस्क च्या माध्यमातून बंद्यांना त्यांच्या बायोमॅट्रीक फिंगरप्रिंटच्या सहाय्याने त्यांच्या केस प्रकरण संदर्भातील अद्ययावत माहिती, मनिऑर्डर, बंदी वेतन, पॅरोज/फर्लो रजा, मुलाखत सुविधा, दूरध्वनी सुविधा, माफी व इतर आवश्यक माहिती पाहणे शक्य होणार आहे.

## जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात गट–क पदांची भरती

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

सैनिक कल्याण विभागाच्या अधिपत्याखाली असलेल्या जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातील पुढील सरळसेवेची पदे भरण्यासाठी फक्त माजी सैनिकांच्या पत्नी तसेच माजी सैनिक उमेदवारांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहे.

सरळ सेवेची पदे, कल्याण संघटक -४०, वस्तीगृह अधीक्षक-१७, कवायत प्रशिक्षक-१, शारीरिक प्रशिक्षण निर्देशक-१, तसेच सशस्त्र दलातील मृत सैनिकांच्या पत्नी यांच्याकरीता अधीक्षिका गट क-१ ही पदे भरली जाणार आहे. अधीक्षिका पदाकरीता भारताच्या सशस्त्र दलातील मृत सैनिकांच्या पत्नी उपलब्ध न झाल्यास सेवाप्रवेश नियमांच्या अटींची पूर्तता करणाऱ्या माजी सैनिकांच्या पत्नी या उमेदवारांकडून ऑनलाइन पद्धतीने अर्ज मागविण्यात येईल. वरील पदापैकी १ पद हे अपंग संवर्गातून किमान ४० टक्के अपंगत्व असलेल्या उमेदवारांमधून दिव्यांगत्वाच्या प्रकारानुसार कर्तव्य व जबाबदारीचा विचार करून गुणवत्ता व उपलब्धतेनुसार भरण्यात येईल.सदर भरती प्रक्रिया टीसीएस-आयओएन यांच्यामार्फत होणार आहे. प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. पात्र उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज www.mahasainik.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर दि. १२ फेब्रुवारी ते ३ मार्च २०२४ या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील. त्यानंतर सदर लिंक बंद करण्यात येईल. याची नोंद घ्यावी, असे चंद्रपूरचे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी कळविले आहे.

## मूल तालुक्यातील फिस्कुटी,भावराळा,चांदपूर,चांदपूर हेटी येथील जिल्हा परिषद शाळांमध्ये बुक वाटप

### शिक्षकच घडवतो देशाचे भवितव्य : नाजुका आलाम

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

शिक्षक केवळ विद्यार्थी घडवत नाही तर देशाचे भवितव्य घडवत असतो. म्हणून शिक्षकाचे स्थान सर्वोच्च आहे. शाळेतील विद्यार्थ्यांनी प्रत्येक अडचणींना तोंड देत विद्यार्थी दशेत मुलांनी सतत उपक्रमशील ठेवत असल्याचे मत सामाजिक कायकर्त्या नाजुका हनुमान आलाम यांनी सांगितले.

महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघ मर्यादित, महाराष्ट्र संचालक तथा चंद्रपूरचे माजी सभापती काँग्रेस नेते दिनेश चोखारे यांच्या मार्गदर्शनात सामाजिक कायकर्त्या नाजुकाक आलाम, काँगेसचे पदाधिकारी सामाजिक कार्यकर्ते करण कुंभरे, यांचे उपस्थित मूल तालुक्यातील फिस्कुटी, भावराळा, चांदपूर, चांदपूर हेटी , येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळांमध्ये बुक वाटप करण्यात आले.यावेळी फिस्कुटी येथे शाळा समितीच्या अध्यक्ष्या ज्योत्सना नितीन राऊत, नदांजी आबोरकर, साईनाथ मांडाळे, चामदेव कावळे, पुरुषोत्तम वाढई, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्याक वाकडे , शिक्षक खोब्रागडे , भोयर , देऊळवार , साखरे , वाघमारे , बोबडे , भावराळा येते मुख्याध्यपक एकनाथ गेडाम, शिक्षिका अनघा जाकुलवार, कल्पना पेंदोर, देवयानी शूरपम,चांदापूर येथे जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक अनिल नैताम, शिक्षक रुपेश परसवार, सुनील निमगडे, शिक्षिका कविता रोकमवार, शिक्षक सुरेश जिल्हेवार, शिक्षिका ज्योती सूर्यवंशी, चांदपूर हेटी येथे शाळेचे मुख्याध्यापक नंदकिशोर शेरकी यांचेसह तसेच शिक्षक, विद्यार्थी आणि शाळेतील कर्मचारी उपस्थित होते.पुढे बोलतांना त्या म्हणाल्या कि, दिनेश चोखारे याचे हे कार्य अभिमानास्पद असून आज आपल्याला सामाजिक कार्यासह सर्व क्षेत्रात प्रगती करावीच लागेल.जोपर्यंत आपण ध्येय ठेऊन काम करत नाही, तोपर्यंत आपण काय करतो याला महत्त्व नाही. म्हणून समाजात वावरताना कोणता तरी उद्देश समोर ठेऊनच ध्येय प्राप्त करावे लागेलच. विद्यार्थ्यांनी सर्व क्षेत्रात भेदभाव न करता प्रगती केली पाहिजे. तसेच विद्यार्थ्यांनी बचतीची सवय लावली पाहिजे त्यांनी मनी बँक चा वापर केला तर तो फायदा त्यांनाच होईल असेही त्या म्हणाल्या.वरील सर्व शाळांमध्ये सामाजिक कार्यकर्ता नाजूका आलाम यांनी शाळांना पुस्तके आणि शालेय साहित्याचे वाटप केले.जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कारवा आणि जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा जुनोना मध्ये बुक वाटप करण्यात आले.यावेळी जुनोनाच्या मुख्याध्यापिका ज्योती लहामगे, शाळा समितीच्या शांताताई मोरे, शिक्षिका उषा इटनकर, शिक्षिका चंदा पूद्दटवार, शिक्षिका सुमित्रा चौधरी, शिक्षिक प्रफुल करवाडे, शिक्षिक प्रकाश गोरे आणि जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कारवा येते मुख्याध्यापक आत्माराम शेंडे यांची उपस्थित होती.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .